## प्रेस नोट

दिनांक ०९/११/२०२०

**तुंगारेश्वर वन्यजीव अभयारण्य, गोखीवरे वसई येथील रोजंदारी मजूर व वन परिक्षेत्र अधिकारी यांना लाच स्विकारताना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने घेतले ताब्यात.**

| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | **ठाणे** |
|---|---|
| गुन्हा नोंद क्रमांक | —— |
| कलम | —— |
| लोकसेवकाचे नाव व कार्यालय | **१) दिलीप नवनाथ तोंडे, वय ३६ वर्षे, वन परिक्षेत्र अधिकारी, (वर्ग २)**<br>**२) अनंत रघुनाथ सोनवणे, वय ४१ वर्षे, रोजंदारी मजूर, (वर्ग ४) वनविभाग वनपरिक्षेत्र अधिकारी कार्यालय, तुंगारेश्वर वन्यजीव अभयारण्य गोखीवरे, वसई** |
| मागितलेल्या लाचेची रक्कम | १०,००,०००/—रुपये (दहा लक्ष) |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | २,००,०००/—रुपये (दोन लक्ष) |
| थोडक्यात हकिकत | यातील तक्रारदार यांच्यावर वाईल्ड लाईफ प्रोटेक्शन अॅक्ट व इंडीयन फॉरेस्ट अॅक्ट अंतर्गत दाखल असलेल्या गुन्हयामध्ये मदत करण्यासाठी दिनांक ०५/११/२०२० रोजी वरील नमुद लोकसेवक क्र १ यांनी लोकसेवक क्र २ यांचेमार्फतीने तक्रारदार यांच्याकडे १०,००,०००/— रुपये(दहा लक्ष) लाचेची मागणी केली होती.<br>तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक ०९/११/२०२० रोजी पडताळणी केली असता, लोकसेवक क्र.१ यांनी लाचेची मागणी केली व तक्रारदार यांच्याकडे असलेली २,००,०००/— रुपये(दोन लक्ष) लाचेची रक्कम लोकसेवक क्र. २ यांना देण्यास सांगितले. त्यानुसार तक्रारदार यांनी लोकसेवक क्र २ यांचेशी संपर्क साधला असता लोकसेवक क. २) **अनंत रघुनाथ सोनवणे** यांना तक्रारदार यांचेकडुन लाचेचा पहिला हप्ता म्हणून २,००,०००/—रुपयांची लाच स्विकारताना रंगेहात पकडण्यात आले व लोकसेवक क्र १) **दिलीप नवनाथ तोंडे** यांना ताब्यात घेण्यात आले. |

लाचलुचपत प्रतिबधंक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्द्ल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, ठाणे परिक्षेत्र, ठाणे यांचेशी संपर्क करावा.

---


संपर्क पत्ता :— **ला.प्र.वि., ठाणे, मध्यवर्ती कारागृहासमोर, ठाणे पश्चिम, ४००६०१**
संकेतस्थळ :— acbmaharashtra@mahapolice.gov.in
ई—मेल :— spacbthane@mahapolice.gov.in
ऑनलाईन तक्रार
अॅप्लीकेशन :— acbmaharashtra.net
टोल फ्री नं :— १०६४
दुरध्वनी क्र. :— ०२२—२०८१३५९८/२०८१३५९९
व्हॉटस् अॅप क्र. :— ९९३०९९७७००


(मदन बल्लाळ)
पोलीस उप अधीक्षक,
अॅन्टी करप्शन ब्युरो,ठाणे परिक्षेत्र,ठाणे

पोलीस उप अधीक्षक अॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे

Scanned with CamScanner